दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.११ जानेवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १३८ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 11 January 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 138 | Pages 4 | Rate 4 Rs


## दादागिरीची भाषा आम्हाला शिकवू नका

**मुंबई**–आम्ही मंत्री पदाला लाथ मारून बाहेर पडलो आहोत. शंभर दिवस शेळीसारखे जगण्यापेक्षा दहा दिवस वाघासारखे जगू. त्यामुळे आम्हाला दादागिरीची भाषा शिकवू नका, तो आमचा जुना 'धंदा' आहे. आम्ही असेच आमदार झालो नाहीत. आम्हाला ३०२, ३०७ चांगलीच माहिती आहेत. ज्याच्यावर साधी एकही केस नाही, तो शिवसैनिक कसला? अशा आक्रमक शब्दांत शिवसेना नेते आणि मंत्री गुलाबराव पाटील यांनी विरोधकांवर आणि स्थानिक पोलिसांवर हल्लाबोल केला. ते अहिल्यानगर येथील सभेत बोलत होते.अहिल्यानगर महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचला आहे. २०२३ मध्ये कार्यकाळ संपलेल्या अहिल्यानगर महानगरपालिकेत गेल्या दोन वर्षांपासून प्रशासक कार्यरत आहेत. त्यामुळे येथील महानगरपालिका निवडणूक विशेष लक्षवेधी ठरणार आहे. २००३ मध्ये या महानगरपालिकेत गेल्या २० वर्षांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या सर्वच पक्षांचे महापौर झाले आहेत.

# गहिनीनाथगडाचा भव्य विकास ही आपली मनोमन इच्छा; यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दुधात साखर टाकली-ना.पंकजाताई मुंडे

## लोकांचे प्रेम, आशीर्वाद आणि डोळ्यातील आदर कायम राहण्याजोगे काम हातून घडावे हीच संत वामनभाऊ चरणी प्रार्थना





दैनिक वादळ वार्ता
**पाटोदा । प्रतिनिधी**

मी पालकमंत्री असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथगडाच्या विकासासाठी निधी आणून विकास कामांना सुरुवात केली होती. एक लेक म्हणून अधिकाधिक भव्य दिव्य अशा गडाच्या विकासाची मनोमन इच्छा होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुधात साखर टाकली असून आज जो गहिनीनाथ गडाचा विकास सुरू आहे तो एकमेव देवेंद्र फडणवीस यांच्या मुळेच शक्य झाला आहे. त्याबद्दल आपण त्यांचे आभार मानते. त्याचबरोबर लोकांचे हे प्रेम, आशीर्वाद आणि डोळ्यातील आदर कायम राहण्याजोगे काम आपल्या हातून घडावे हीच संत वामनभाऊ चरणी आपण प्रार्थना करत असल्याची भावना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गहिनीनाथगडावर बोलताना व्यक्त केली.

संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यासाठी गहिनीनाथगडावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी मंत्री आ धनंजय मुंडे उपस्थित होते. प्रारंभी गहिनीनाथगडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज शास्त्री यांनी मुख्यमंत्री व पंकजाताई मुंडे यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पंकजाताई मुंडे यांनी आपल्या मनमोकळ्या भावना व्यक्त केल्या. संत वामनभाऊ महाराज व संत भगवानबाबा हे आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान असून डोंगरदऱ्यांमध्ये, कडी -कपारींमध्ये राहणारा हा समाज ज्यांनी सुसंस्कारित केला अशा या संतांचे संस्कार देशाच्या कानाकोपऱ्यात आजही आपल्याला दिसतात. ज्या काळामध्ये माणूस माणसासारखा वागत नव्हता, त्या काळात त्यांना संस्कार देऊन सन्मार्गाला लावण्याचे काम संत भगवानबाबा आणि संत वामनभाऊ यांनी केले आहे. संत वामनभाऊ यांना वाचासिद्धी होती असे म्हणतात. आजही या संतांचे विचार हे आपल्यासाठी दीपस्तंभ असून त्यांच्या विचारावर आपली नितांत श्रद्धा आहे. त्याच आशीर्वादाने आणि श्रद्धेने आपण वाटचाल करत असल्याची ग्वाही ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी दिली.

### लेकीच्या पदरात मुख्यमंत्र्यांनी साखर टाकली!

**गहिनीनाथगडाचा विकास आणि गहिनीनाथगडाची लेक म्हणून असलेल्या नात्याचा संदर्भाने बोलतांना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला आपल्या वडिलांना गोड धोड खाऊ घालायची इच्छा असते, त्यासाठी ती मूठभर गहू, मूठभर तांदूळ आपल्या पदरात घेऊन येते त्यात साखरेची कमी असते. ती साखर टाकण्याचे काम एक प्रकारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यामुळे मी पालकमंत्री असताना गडाच्या भव्य विकासाचा घेतलेला ध्यास व माझी इच्छा पूर्णत्वास येत आहे. गहिनीनाथ गडाचा आज भव्य दिव्य विकास सुरू असून हे एकमेव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातूनच शक्य झाल्याचे ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.**

# धुरखेडा फाट्याजवळ डंपरच्या कटमुळे टॅक्सीचा भीषण अपघात दोन प्रवासी मृत्यूच्या दारात!

## अवजड वाहनांच्या बंदीचा नियम धाब्यावर; संतप्त ग्रामस्थांची कडक कारवाईची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**



शहादा-प्रकाशा रस्त्यावर लांबोळा गावानजीक असलेल्या धुरखेडा फाट्याजवळ शनिवारी सकाळी एक भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने जाणाऱ्या डंपरने कट मारल्यामुळे समोरून येणाऱ्या इको टॅक्सीचा अक्षरशः चक्काचूर झाला. या अपघातात दोन प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे, तर इतर प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी साडेनऊ वाजेच्या सुमारास इको टॅक्सी (क्रमांक एम.एच.३९, ८२७७) प्रवाशांना घेऊन जात असताना, धुरखेडा फाट्याजवळ समोरून येणाऱ्या एका डंपरने अचानक टॅक्सीला कट मारला. डंपरचा वेग जास्त असल्याने टॅक्सी चालकाचे नियंत्रण सुटले आणि भीषण धडक झाली. ही धडक इतकी जोरदार होती की टॅक्सीचा पुढचा भाग पूर्णपणे चेपला गेला.अपघात होताच परिसरात मोठा आवाज झाला. लांबोळा आणि धुरखेडा परिसरातील ग्रामस्थांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. टॅक्सीमध्ये अडकलेल्या जखमी प्रवाशांना ग्रामस्थांनी मोठ्या शिताफीने बाहेर काढले. रक्ताच्या थारोळ्यात असलेल्या दोन गंभीर जखमींना तात्काळ शहादा येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. ग्रामस्थांच्या प्रसंगावधानामुळे जखमींना वेळेवर उपचार मिळण्यास मदत झाली.या अपघातामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या मार्गावर अवजड वाहनांना बंदी असतानाही डंपर या रस्त्यावर आलाच कसा, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. घटनेची माहिती मिळताच शहादा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. डंपर चालक अपघातानंतर फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या मार्गावर गेल्या काही दिवसांपासून अपघातांचे प्रमाण वाढले आहे. अवजड वाहनांच्या घुसखोरीमुळे प्रवाशांचा जीव टांगणीला लागला आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने केवळ कागदावर बंदी न घालता, रस्त्यावर कडक अंमलबजावणी करावी आणि दोषी डंपर चालकावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.रात्री उशिरापर्यंत शहादा पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्याचे काम सुरू होते. या घटनेमुळे शहादा परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# साने गुरुजी निवासी विद्यालय केजच्या विद्यार्थ्यांनी दिला स्वच्छतेचा संदेश

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**



नगरपंचायत कार्यालय केज अंतर्गत केज शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात येत असुन या स्वच्छता अभियानात येथील साने गुरुजी निवासी विद्यालय केज च्या विद्यार्थ्यांनी धारुर रोड ते भवानी चौक या स्वच्छ शहर सुंदर शहर यासाठी या शाळेतील स्काऊट गाईड व विको क्लब व शाळकरी विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात भवानी चौकची साफसफाई करून परिसरातील केर कचरा साफ करुन जनतेची मने जिंकली व या भर चौकात स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी अतिशय सुंदर व उत्कृष्ट असे स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर करून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले.या प्रसंगी उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात पथनाट्याला प्रतिसाद दिलाहे पथनाट्य व स्वच्छता अभियानात संकुलाच्या प्राचार्या डॉ.कविता कराड मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आला या प्रसंगी केज नगर पंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सिताताई बनसोड, गटनेते हारुणभाई इनामदार,सोनकांबळे व इतर नगर पंचायतचे नगरसेवक व कर्मचारी उपस्थित होते तसेच शाळेतील कर्मचारी गुजर नागनाथ,कल्पना जोशी, मजहर शेख,इंद्रमोहन कराड यांनी ही विद्यार्थ्यां सोबत या स्वच्छता मोहीमेत सहभाग नोंदविला होता.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा येथे 'बाल आनंद मेळाव्याचे' उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील सात्रा येथे जि.प.प्रा.शाळा सात्रा व हनुमान नगर वस्ती यांच्या वतीने बाल आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या विषयी सविस्तर माहिती अशी की, विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि शालेय जीवनात आनंदाचे वातावरण निर्माण करण्यासाठी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सात्रा (हनुमान नगर वस्ती) येथे 'बाल आनंद मेळाव्याचे' भव्य आयोजन करण्यात आले होते, हा सोहळा आज, शनिवार दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाला.या मेळाव्याचा उद्देशच EARN AND LEARN ' म्हणजे कमवा आणि शिका,तसेच मुलांना चलनी नोटांची माहिती व्हावी, व्यवहार ज्ञान कळावे,तसेच आपले आई वडीलांच्या कष्टा बाबत मुलांना जान व्हावी हा होता. या आनंदोत्सवामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी विक्री साठी फळे,भाजीपाला,खेळणे,वेगवेगळे खाद्य पदार्थ बनवऊन विक्रीसाठी आणले होते. हा सोहळा केंद्राचे केंद्रप्रमुख श्री शेख सर केंद्रीय मुख्याध्यापक श्री मोटे सर आंधळे सर, गायकवाड सर, नवले सर, दोन्ही शाळेचे मुख्याध्यापक, सहशिक्षक गावचे सरपंच, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,उपाध्यक्ष पालक व सर्व गावकरी यांच्या उपस्थितीत हा बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

## वादळी कट्टा

### शालेय विद्यार्थी लूट

शाळा म्हणे ज्ञानाचं घर,
पण फी वाढते दरवर्षी भरभर!
प्रवेश घेताच सुरू खेळ,
पुस्तकाआधी पावतीचा मेळ.
वह्या, गणवेश, उपक्रम नाव,
प्रत्येकासाठी वेगळा भाव!
शिकवण कमी, खर्चच जास्त,
विद्यार्थी अडकतो फीच्या जाळ्यात
फास्ट!
वर्षाअखेरीस निकाल येतो,
मार्क्सपेक्षा बिलच जास्त वाढतो!

**–संपादक : अजय भांगे**

# आरुष चिखले ची मराठी चित्रपटसृष्टीत दमदार एन्ट्री

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

पोदार इंटरनॅशनल स्कूल, नांदेड येथील इयत्ता २ 'ई' मध्ये शिक्षण घेत असलेला आरुष सिंधू अमर चिखले याने आपल्या पहिल्याच मराठी चित्रपटातून अभिनय क्षेत्रात यशस्वी पदार्पण केले आहे. 'बाप्या' या मराठी चित्रपटात त्याने प्रमुख भूमिका साकारत सुप्रसिद्ध अभिनेते गिरीश कुलकर्णीआणि राजश्री देशपांडे यांच्या मुलाची भूमिका साकारली आहे.

विशेष म्हणजे 'बाप्या ' या चित्रपटाची निवड पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (झखत्रज्ञ) मध्ये प्रदर्शनासाठी करण्यात आली आहे, ही नांदेडसाठी आणि शालेय वयातील कलाकारासाठी अभिमानास्पद बाब आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन समीर तिवारी यांनी केले असून निर्मितीची जबाबदारी मुक्ता तिवारी यांनी सांभाळली आहे. चित्रपटात देविका दफ्तरदार, श्रीकांत यादव यांच्यासह अनेक नामवंत कलाकारांच्या भूमिका आहेत.

अतिशय लहान वयात अभिनयातील नैसर्गिकपणा आणि आत्मविश्वास दाखवणाऱ्या आरुषच्या या यशाबद्दल शाळा, शिक्षक, पालक आणि मित्रपरिवारातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

आरूष चिखले हा लोहा तालुक्यातील धावरी या गावचा भाचा आहे आजी मंगल इंगळे,आजोबा विठ्ठल नारायण इंगळे यांचा तो नातु आहे हे कुटुंब शेतकरी आहेत तर एक मामा सावन इंगळे (शिक्षक) आणि एक मामा डॉक्टर सचीन इंगळे हे आहेत सुशिक्षित परिवाराचा हा भाचा आहे ग्रामीण भागातील एका चिमुकल्याला मोठ्या पिक्चर मध्ये काम करत असल्यामुळे सर्व स्तरातून त्यांच्या कौतुक होत आहे.

विशेष म्हणजे 'बाप्या ' या चित्रपटाची निवड पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (PIFF) मध्ये प्रदर्शनासाठी करण्यात आली आहे, ही नांदेडसाठी आणि शालेय वयातील कलाकारासाठी अभिमानास्पद बाब आहे. ग्रामीण भागात सुद्धा चांगले मोठे कलाकार घडू शकतात याचेही ताजे उदाहरण आहे . आरुष ला शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात चहाते संपर्क करत आहेत.या यशामागे त्यांचे वडील अमर चिखले आणि आई सिंधू चिखले यांचा मोठा सहभाग आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे त्याबद्दल आमदार प्रताप पाटील चिखलीकर युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर ,सामाजिक कार्यकर्ता प्रणीताताई देवरे ,धावरी चे माजी सरपंच साहेबराव पाटील काळे, पत्रकार युनूस शेख, पंडीत पाटील गाडेकर,अभंग पाटील गाडेकर, रुक्माजी पवार ,संग्राम पाटील गाडेकर आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



# संपादकीय

## बिनविरोध येणारच!

जोपर्यंत सत्ता होती, तोपर्यंत सत्तेच्या जवळ जाण्याचा मार्ग म्हणून संघटनेच्या झेंड्याखाली कोणी ना कोणी दिसत होतं. सत्ता नाही, म्हणताच ही गर्दी हळूहळू पांगली. आता तर तो झेंडा धरायलाही कोणी नाही, अशी स्थिती झाली आहे. अंबरनाथमध्ये जी नामुष्की पत्करावी लागली, हे त्याचं पुढचं पाऊल आहे. वरिष्ठ नेतृत्वाकडून बळच मिळालेलं नसतं, तर ते त्यांचं ऐकतील कशाला? काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना ही बाब कोणीतरी समजावून सांगायला हवी. एका बाजूला महानगराच्या कारभाऱ्यांच्या निवडीची धामधूम सुरू असताना दुसऱ्या बाजूला निमशहरी भागातील नगराध्यक्षांची सूत्र हाती घेण्याची प्रक्रियाही सुरू आहे. काही ठिकाणी थेट निवडून आलेला नगराध्यक्ष एका बाजूचा आणि नगरसेवक दुसऱ्या बाजूचे, तर काही ठिकाणी पूर्ण बहुमतासाठी काही नगरसेवक कमी पडत असल्याने पूर्ण बहुमत मिळवण्याची धडपड सुरू आहे. त्यातही काही ठिकाणी पक्ष नेतृत्व आणि स्थानिक नेतृत्वाचं एकमत आहे, तर काही ठिकाणी दुमत! त्यामुळे पक्षांतर्गत पेच मिटवता मिटवता नगराला 'स्थिर शासन' देण्याची कसरत अनेक ठिकाणी बघायला मिळते आहे. त्या गोंधळात नेमकं कोणी कोणाचा हात धरला आहे आणि कोणी कोणाचा हात सोडला आहे, तेच समजेनासं झालं आहे. अंबरनाथमध्ये तर मोठी गंमतच झाली. तिथे भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसचीच युती झाली. दोन्ही पक्षांच्या राज्यपातळीवरील नेत्यांना ही बाब समजली, तेव्हा दोन्हीकडे आश्चर्याचा धक्का बसला. काँग्रेसला जास्तच. कारण, आज देशपातळीपासून प्रत्येक पातळीवर काँग्रेसच्या दृष्टीने भाजप हाच अस्पर्शातला अस्पर्श आहे. बाकी कोणीही एक वेळ चालेल. पण, भाजप? ब्रम्हण्यम्!! काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांनी लगेच तलवार उपसली आणि आपल्या बाराही नगरसेवकांवर कारवाई केली. त्यांना पक्षातून निलंबित केलं. त्या नगरसेवकांसाठी हे आणखी सोयीचं झालं. सर्वच्या सर्व नगरसेवकांचा गट तयार झाला होताच. त्या संपूर्ण गटाने एकदिलाने भाजपमध्ये प्रवेश केला. काय मिळवलं काँग्रेसने? 'तेलही गेलं, तूपही गेलं अन् हाती धुपाटणं आलं'! यासाठी राजकारणात नेहमी समजून उमजून भूमिका घ्यावी लागते. काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांबाबतची पक्षातली नाराजी या प्रकाराने किमान ५० टक्क्यांनी वाढली असणार. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ हे ठार भाजपविरोधी आहेत, हे सर्वश्रुत आहे. पण, त्यांच्या या तडकाफडकी कारवाईचा फायदा शेवटी झाला भाजपलाच! त्यापेक्षा नगरसेवकांच्या गटाला पाचारण करून त्यांच्याशी चर्चा केली असती, त्यांना चर्चेत ठेऊन अन्य काही मार्ग काढला असता, तर नुकसान कमी करता आलं असतं. पण, केवढा धीर आणि मुत्सद्देगिरी – हे दोन्ही कमी पडलं. 'दुष्काळात तेरावा महिना' अशी काँग्रेस संघटनेची स्थिती झाली! अशीच एक युती आकोटमध्येही घडली. स्थानिक भाजप आणि आयआयएम यांची युती. इथे धक्का बसला भाजपला. संपूर्ण राज्यात मतदारांचं ध्रुवीकरण होत असताना त्या प्रक्रियेला या युतीने चांगलाच ब्रेक बसला असता. संपूर्ण राज्यात भाजपच्या दृष्टीने चुकीचा संदेश गेला असता. पक्षनेतृत्वाने ताबडतोब दखल घेऊन युती मोडली आणि अनर्थ टळला. इथे युती मोडली, तरी भाजपमधला एकही जण हलला नाही किंवा सत्ताप्राप्तीसाठी कोणी आणखी कोणता मार्ग निवडला नाही. एमआयएमचा गटही अजून तरी शांत आहे. तो तसाच राहील, असं स्थानिकांचं म्हणणं आहे. काँग्रेस पक्ष संघटनेवरची नेतृत्वाची पकड पूर्णपणे सुटली आहे, असं माध्यमं पुनःपुन्हा सांगताहेत. पण, त्या पक्षाची धुरा केंद्रात आणि राज्यात ज्यांच्या हाती आहे, त्यांना हे म्हणणं गंभीरपणे घ्यावंसं वाटत नाही. काँग्रेसमध्ये आज जेवढा विस्कळीतपणा दिसतो, तेवढा तो कधीच नव्हता. लागोपाठ पराभवांनी पक्षाची घडी विस्कटली आहे, असं नाही. स्वातंत्र्यापासून दीर्घकाळपर्यंत सत्ताधारी राहिल्याने पक्ष संघटना पूर्णपणे सत्ताधीन झाली होती. 'निवडून येणे' एवढाच निकष झाला होता. त्यामुळे पक्षनिष्ठा, संघटनशिस्त, पक्षाच्या व्यापक विचारसरणीशी बांधिलकी – या सगळ्याच गोष्टी गौण झाल्या होत्या. सत्तेच्या केंद्रस्थानी असलेल्यांभोवती संघटना फिरू लागली होती. जोपर्यंत सत्ता होती, तोपर्यंत सत्तेच्या जवळ जाण्याचा मार्ग म्हणून संघटनेच्या झेंड्याखाली कोणी ना कोणी दिसत होतं. सत्ता नाही, म्हणताच ही गर्दी हळूहळू पांगली. आता तर तो झेंडा धरायलाही कोणी नाही, अशी स्थिती झाली आहे. अंबरनाथमध्ये जी नामुष्की पत्करावी लागली, हे त्याचं पुढचं पाऊल आहे. काँग्रेसचा मतदार चिन्ह पाहून जिथे मतदान करतो, पक्षाला अनपेक्षित यश मिळतं, तिथल्या यशाचे मालक तिथलेच नेते असतात. त्यांना वरिष्ठ नेतृत्वाकडून बळच मिळालेलं नसतं, तर ते त्यांचं ऐकतील कशाला? काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षांना ही बाब कोणीतरी समजावून सांगायला हवी. पक्षाची कुठे, कोणाशी, कशासाठी युती आहे हे एकदा काँग्रेसने एकत्रितपणे जाहीर करायला हवं. त्यांच्या नक्की जागा किती आणि कुठे, तेही सांगायला हवं. पक्षातल्या एका गटाने मुंबईत पुढाकार घेऊन भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या प्रकाश आंबेडकर यांच्या गटाशी युती केली. त्यात राष्ट्रीय समाज पक्ष सामील झाल्याचं सांगितलं गेलं. पण, भारिपबरोबरच्या आघाडीचं काय झालं ते नंतरच्या दोनच दिवसांत दिसलं. जेवढ्या जागा आपल्या वाट्याला घेतल्या, तेवढे उमेदवारही दोन्ही पक्षांना मिळाले नाहीत. एकमेकांच्या अंगावर जागा ढकलायची वेळ आली! रासपच्या महादेव जानकर यांचं तर कुठे अस्तित्वच दिसत नाही. अशा दुबळेपणाने बलाढ्य भाजप-शिवसेनेसारख्या पक्षांना काँग्रेस कशी तोंड देणार? पूर्वीच्या महाविकास आघाडीतला काँग्रेसच सर्वात मोठा, राष्ट्रीय पक्ष. त्याची ही अवस्था. इतरांबद्दल काय बोलणार? अशा परिस्थितीत महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून नाही येणार, तर कोण येणार? 'बिनविरोध निवड' हे ज्यांना लोकशाहीविरोधी वाटतं, त्यांना ही राजकीय स्थिती माहीत नाही, समजून घ्यायची नाही, की समजतच नाही?

# मेथीचे केसांसाठी आरोग्यदायी फायदे, तुम्हाला माहिती आहे का?

दैनिक वादळ वार्ता

केसांच्या वाढीसाठी मेथीचा टोनर हा एक नैसर्गिक, सुरक्षित आणि प्रभावी उपाय मानला जातो. मेथीच्या दाण्यांमध्ये प्रोटीन, लेसिथिन, निकोटिनिक ॲसिड, लोह आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे केसांच्या मुळांना पोषण देतात. मेथीचा टोनर टाळूवर वापरल्यास रक्ताभिसरण सुधारते, त्यामुळे केसांच्या मुळांपर्यंत पोषक तत्त्वे नीट पोहोचतात. यामुळे केस गळणे कमी होते आणि नवीन केसांची वाढ होण्यास मदत मिळते. तसेच मेथीमध्ये अँटीफंगल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म असल्यामुळे कोंडा, खाज आणि टाळूवरील संसर्ग कमी होतो, ज्यामुळे केस निरोगी वाढण्यासाठी पोषक वातावरण तयार होते. मेथीचा टोनर केसांना नैसर्गिक मजबुती आणि चमक देतो. नियमित वापर केल्यास केसांचा कोरडेपणा कमी होतो आणि केस मऊ, रेशमी बनतात.

मेथीतील लेसिथिन केसांना खोलवर मॉइश्चर देतो आणि फुटलेली टोकं कमी करण्यास मदत करतो. तसेच हा टोनर टाळूतील अतिरिक्त तेल संतुलित ठेवतो, त्यामुळे अतितेलकट किंवा अतिशुष्क टाळूच्या समस्या कमी होतात. मेथीचा टोनर वापरल्याने केस अकाली पांढरे होण्याची प्रक्रिया मंदावण्यासही मदत होऊ शकते, कारण त्यामध्ये केसांच्या रंगद्रव्याच्या आरोग्यासाठी उपयुक्त पोषक घटक असतात. मेथीचा टोनर घरी सहज तयार करता येतो, त्यामुळे कोणत्याही रासायनिक दुष्परिणामांची भीती राहत नाही.भिजवलेल्या



मेथीच्या पाण्याचा टोनर म्हणून वापर केल्यास केसांच्या मुळांना थंडावा मिळतो आणि ताणतणाव कमी होतो. आठवड्यातून २-३ वेळा टोनर वापरल्यास चांगले परिणाम दिसून येतात. मात्र अतिसंवेदनशील त्वचा असलेल्या व्यक्तींनी आधी पॅच टेस्ट करणे आवश्यक आहे. एकूणच, मेथीचा टोनर हा केसांच्या वाढीसाठी, मजबुतीसाठी आणि टाळूच्या आरोग्यासाठी एक नैसर्गिक व प्रभावी उपाय ठरतो. आजकाल वाढता ताण, प्रदूषण आणि खराब जीवनशैलीमुळे केसांची समस्या लोकांना खूप त्रास देत आहे. एखाद्याचे केस अगदी लहान वयातच पांढरे होत आहेत, तर काही लोकांचे केस इतके वाढले आहेत की ते थांबण्याचे नाव घेत नाहीत. या समस्यांपासून मुक्ती मिळवण्यासाठी अनेक लोक बाजारात उपलब्ध असलेल्या उत्पादनांचा वापर करतात परंतु तरीही त्यांना अपेक्षित परिणाम मिळत नाही. याशिवाय काही लोक खूप महागडे उपचारही घेतात, परंतु दीर्घकालीन परिणाम मिळत नाहीत. अशा परिस्थितीत घरगुती उपचार खूप फायदेशीर ठरतात.

**साहित्य**

१०-२० रुपये किंमतीचे मेथीचे दाणे
रोझमेरीची पाने
वाळलेल्या आवळ्या
अंबाडी बियाणे
नारळ तेल

**कृती**–हेअर ग्रोथ टॉनिक बनविणे खूप सोपे आहे. यासाठी एका कढईत २ चमचे मेथीचे दाणे घालून त्यात रोझमेरीची पाने, वाळलेली आवळी, अंबाडी यांचा समावेश करावा. यानंतर, त्यात एक ग्लास पाणी घाला आणि सर्व काही चांगले उकळवा. नंतर त्यात २ चमचे नारळ तेल घाला. आता हे मिश्रण गाळून घ्या आणि एका कंटेनरमध्ये ठेवा, तुमचे हेअर ग्रोथ टॉनिक तयार होईल. हे हेअर टॉनिक कॉटन वूलवर घ्या आणि केसांच्या मुळांना चांगल्या प्रकारे लावा . याशिवाय तुम्हाला असे वाटते की त्या जागेवरून तुमचे केस कमी होत आहेत, तुम्ही ते तेथेही लावू शकता. यामुळे केसांची वाढ तर वाढतेच, शिवाय केस गळणेही कमी होते. केसांना निरोगी आणि काळे ठेवण्यात देखील हे खूप उपयुक्त ठरते .मेथी केसांसाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. मेथीच्या दाण्यांमध्ये प्रोटीन, लेसिथिन, आयर्न आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात, जे केसांच्या मुळांना पोषण देतात. मेथीचा वापर केल्यास केस गळणे कमी होते, नवीन केसांची वाढ होते आणि केस मजबूत बनतात. तसेच मेथीमध्ये अँटीफंगल गुणधर्म असल्यामुळे कोंडा, खाज आणि टाळूवरील संसर्ग कमी होतो. मेथी केसांना नैसर्गिक चमक देते, कोरडेपणा कमी करते आणि फुटलेली टोकं सुधारण्यास मदत करते. मेथी पेस्ट, मेथीचे पाणी किंवा मेथी टोनर नियमित वापरल्यास केस निरोगी, जाड आणि

# दालचिनी आणि मधामधील आयुर्वेदिक गुणधर्म नेमकं काय? एकत्र खाल तर निरोगी राहाल

दैनिक वादळ वार्ता

हिवाळ्याच्या हंगामात आरोग्याची खूप काळजी घ्यावी लागते, कारण हिवाळ्यात रोग प्रतिकारशक्ती कमकुवत होते. अशा परिस्थितीत काही नैसर्गिक गोष्टींचे सेवन आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. हिवाळ्यात ताप आणि घसा खवखवणे यासारखे हंगामी आजार वाढतात . अभ्यास दर्शवितो की नैसर्गिक उपचारांमुळे सौम्य हंगामी संसर्गापासून आराम मिळू शकतो. हंगामी संसर्गाच्या उपचारांसाठी दालचिनी आणि मध हे दोन उत्तम घटक आहेत. दळलेली दालचिनी आणि मध यांचे मिश्रण आयुर्वेदात एक शक्तिशाली औषध मानले जाते. चला तर मग तुम्हाला सांगू या की ग्राउंड दालचिनी मधात मिसळल्याने काय होते? मध हा नैसर्गिक आणि औषधी गुणधर्मांनी युक्त असा पदार्थ असून आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर मानला जातो. मधामध्ये अँटिऑक्सिडंट्स, जीवनसत्त्वे, खनिजे आणि नैसर्गिक साखर असल्यामुळे तो शरीराला त्वरित ऊर्जा देतो व थकवा कमी करतो.

नियमित मध सेवन केल्यास रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि सर्दी-खोकला, घसा दुखणे यांसारख्या त्रासांपासून आराम मिळतो. मध पचनसंस्था सुधारतो, आम्लता कमी करतो आणि बद्धकोष्ठतेवरही उपयोगी ठरतो. तसेच मध हृदयासाठी लाभदायक असून कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास मदत करतो. त्वचा व केसांसाठीही मध उपयुक्त आहे, कारण तो त्वचेला ओलावा देतो,





जखमा लवकर भरून येण्यास मदत करतो आणि त्वचा निरोगी ठेवतो. वजन नियंत्रणासाठी कोमट पाण्यासोबत मध घेतल्यास चरबी कमी होण्यास मदत मिळते. एकूणच, योग्य प्रमाणात मधाचे सेवन केल्यास तो शरीराला ऊर्जा, संरक्षण आणि आरोग्य देणारा अत्यंत लाभदायक नैसर्गिक आहार घटक आहे.

दालचिनी (दालचिनी) ही एक सुगंधी मसाला असून तिचे आरोग्यदायी फायदे अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. दालचिनीमध्ये अँटिऑक्सिडंट्स, अँटीबॅक्टेरियल आणि अँटीइन्फ्लेमेटरी गुणधर्म भरपूर प्रमाणात असतात, जे शरीराला विविध आजारांपासून संरक्षण देतात. दालचिनी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते, त्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांसाठी ती उपयुक्त ठरते. पचनसंस्था सुधारण्यासाठी दालचिनी फायदेशीर असून गॅस, ॲसिडिटी, पोटदुखी आणि अपचन कमी करण्यास मदत करते. सर्दी, खोकला, घसा दुखणे यावर दालचिनी नैसर्गिक औषधासारखी काम करते आणि शरीराला उष्णता देते. दालचिनी हृदयाच्या आरोग्यासाठी लाभदायक असून खराब कोलेस्ट्रॉल कमी करून रक्ताभिसरण सुधारते. तसेच ती रोगप्रतिकारक शक्ती वाढवते, वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते आणि सांधेदुखी व सूज कमी करण्यासही उपयोगी ठरते. योग्य प्रमाणात दालचिनीचा आहारात समावेश केल्यास शरीर निरोगी, ऊर्जावान आणि तंदुरुस्त राहण्यास मदत होते. तज्ज्ञांच्या मते, दालचिनी आणि मध या दोहोंमध्ये वैयक्तिकरित्या प्रतिजैविक आणि दाहक-विरोधी गुणधर्म असतात. दालचिनी पावडर आणि मध ऊर्जा आणि रोग प्रतिकारशक्ती वाढवू शकते, ज्यामुळे शरीर संक्रमणाविरूद्ध लढण्यासाठी तयार होते. दालचिनीचे दाहक-विरोधी, अँटिऑक्सिडेंट आणि अँटीमाइक्रोबियल गुणधर्म घसा खवखवण्यापासून मुक्त होण्यास मदत करतात. सर्दीची लक्षणे कमी करण्यातही ते उपयुक्त आहेत.त्याचे बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ गुणधर्म तणावामुळे होणार् या सामान्य हंगामी संक्रमणाचा प्रसार कमी करतात. हे मध घालून नैसर्गिक बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारा पदार्थ आणि सुखदायक प्रभाव देखील प्रदान करते. दालचिनी आणि मध चांगल्या बॅक्टेरियाची पातळी वाढवू शकतात. जेव्हा आतडे निरोगी नसतात तेव्हा शरीर हंगामी संसर्गास अधिक संवेदनशील होते. दालचिनी आणि मध स्मरणशक्ती वाढविण्यात साहाय्यक ठरू शकतात. त्याच वेळी, मधात असलेले पॉलिफेनॉल अल्झायमर सारख्या आजारांशी लढण्यास मदत करतात. दालचिनी आणि मध खराब कोलेस्ट्रॉल आणि ट्रायग्लिसेराइड्स कमी करून कोलेस्टेरॉल नियंत्रित करण्यास देखील मदत करू शकतात. यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होऊ शकतो.

# लिंबू खाल्ल्यानंतर डोळे अचानक बंद का होतात?

दैनिक वादळ वार्ता

लिंबू प्रत्येक हंगामात खाल्ले जाते आणि त्याची चव लोकांना खूप आवडते. बरेच लोक मीठ लावून थेट लिंबू चाटतात, ज्यामुळे त्यांची मळमळ दूर होते. तुम्ही कधी पाहिले आहे का की कोणी लिंबाचा तुकडा चाटला की त्याचे डोळे आपोआप बंद होतात आणि चेहरा आकुंचन पावतो. हा विनोद नाही, तर आपल्या शरीराची नैसर्गिक प्रतिक्षेप प्रतिक्रिया आहे. आंबट चव आपल्या मेंदूवर आणि मज्जातंतूंवर इतक्या वेगाने परिणाम करते की शरीर कोणताही विचार न करता लगेच प्रतिक्रिया देण्यास सुरवात करते. संशोधनात असे सूचित केले गेले आहे की ह्यामागे चव, मज्जातंतू आणि मेंदू यांचा समन्वय आहे. वैज्ञानिक संशोधनानुसार, जेव्हा लिंबू जिभेला स्पर्श करते तेव्हा त्यात असलेले सायट्रिक ॲसिड आपल्या चाचणी कळ्यांना एक तीक्ष्ण सिग्नल पाठवते.हा सिग्नल ट्रायजेमिनल मज्जातंतू आणि चेहर्यावरील मज्जातंतूद्वारे थेट मेंदूपर्यंत पोहोचतो. ही आम्लयुक्त उत्तेजन इतकी तीव्र असते की मेंदू त्यास सौम्य धोका किंवा अत्यंत उत्तेजक घटक म्हणून ओळखतो आणि शरीराला त्वरित बचावात्मक प्रतिसाद देण्याची आज्ञा देतो. या प्रक्रियेत, डोळे बंद करणे एक प्रकारचे संरक्षणात्मक प्रतिक्षेप मानले जाते. ज्याप्रमाणे लख्ख प्रकाशात किंवा जोरदार वाऱ्यात डोळे आपोआप बंद होतात, त्याचप्रमाणे आंबट चवची तीव्रता मेंदूला काही क्षणांसाठी डोळे बंद करण्याचे संकेत देते. ही प्रतिक्रिया आपल्याला अचानक अस्वस्थ संवेदनेपासून वाचविण्याचे कार्य करते.



तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की आपण लिंबू चाटताच आपल्या तोंडाला पाणी येते, जो या प्रतिक्रियेचा एक भाग आहे. आंबट चवमुळे लाळ ग्रंथी खूप सक्रिय होतात, ज्यामुळे तोंडात असलेले आम्ल पातळ केले जाऊ शकते. या काळात चेहर् याचे स्नायू आकुंचन पावतात आणि डोळे बंद होतात, त्यामुळे संपूर्ण चेहरा एकाच वेळी प्रतिक्रिया देताना दिसतो. ही प्रतिक्रिया प्रत्येक व्यक्तीमध्ये सारखी नसते. ज्या लोकांच्या मज्जातंतू अधिक संवेदनशील असतात अशा लोकांमध्ये डोळे अधिक द्रुतपणे आणि जास्त काळ बंद होतात. मुलांमध्ये हा प्रतिक्षेप आणखी स्पष्ट होतो, कारण त्यांची मज्जासंस्था उत्तेजनासाठी अधिक संवेदनशील असते. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, लिंबू चाटताना डोळे बंद करणे किंवा कोणतीही जास्त आंबट वस्तू चाटणे ही काही विचित्र सवय नाही, तर शरीराची एक स्मार्ट आणि नैसर्गिक प्रतिक्रिया आहे. हे दर्शविते की आपला मेंदू अस्वस्थ अनुभवांपासून आपले संरक्षण करण्यासाठी चव, मज्जातंतू आणि स्नायू समक्रमित करण्यासाठी किती वेगाने कार्य करते. पुढच्या वेळी जेव्हा आपण लिंबू चाटता आणि डोळे बंद करता तेव्हा समजून घ्या की आपले शरीर आपल्याला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.लिंबू हा अत्यंत पोषक आणि औषधी गुणधर्म असलेला फळपदार्थ असून आरोग्यासाठी अनेक प्रकारे फायदेशीर मानला जातो. लिंबूमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी, अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोन्यूट्रिएंट्स असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यास मदत करतात. नियमित लिंबू सेवन केल्यास सर्दी-खोकला, ताप, घसा दुखणे यांसारख्या संसर्गांपासून संरक्षण मिळते. लिंबू शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करतो आणि यकृताचे कार्य सुधारतो. तसेच तो पचनसंस्था सक्रिय करून आम्लता, अपचन, गॅस यांसारख्या समस्या कमी करतो. सकाळी कोमट पाण्यासोबत लिंबू घेतल्यास मेटाबॉलिझम सुधारतो आणि शरीराला ताजेपणा मिळतो.

लिंबू त्वचा, हृदय आणि वजन नियंत्रणासाठीही उपयुक्त आहे. व्हिटॅमिन सीमुळे कोलेजन निर्मिती वाढते, त्यामुळे त्वचा निरोगी, उजळ आणि तजेलदार दिसते. लिंबूमधील अँटिऑक्सिडंट्स त्वचेवरील डाग, सुरकुत्या कमी करण्यास मदत करतात. लिंबू रक्तातील खराब कोलेस्ट्रॉल कमी करून हृदयाचे आरोग्य जपतो. तसेच लिंबू भूक नियंत्रित ठेवतो, त्यामुळे वजन कमी करण्यास मदत मिळते. लिंबूमध्ये असलेले पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास उपयुक्त ठरते. मात्र अति प्रमाणात लिंबू सेवन केल्यास दातांवर परिणाम किंवा ॲसिडिटी होऊ शकते, म्हणून योग्य प्रमाणात लिंबू खाणे आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

# जिल्ह्याच्या प्राधान्य विकास गरजांसाठी सीएसआर निधीचे लक्ष्यित नियोजन आवश्यक-जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया

## सीएसआर कनेक्ट कॉनक्लेव २०२६ परिषद उत्साहवर्धक वातावरणात यशस्वीपणे संपन्न



दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सीएसआर ही समाजाभिमुख विकासासाठीची प्रभावी साधनयोजना आहे. जिल्ह्यातील सामाजिक, आर्थिक व मानवी विकास निर्देशांक उंचावण्यासाठी उद्योग व सीएसआर संस्थांनी जिल्हा प्रशासनाच्या गरजेनुसार व प्राधान्यक्रमानुसार निधीचे लक्ष्यित नियोजन करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्ह्यातील विविध विकासात्मक गरजांसाठी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (उडठ) निधीचा नियोजनबद्ध, समन्वयित व परिणामकारक वापर व्हावा, या उद्देशाने जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'सीएसआर कनेक्ट कॉनक्लेव २०२६' परिषदेत डॉ. आशिया बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, जिल्हा नियोजन अधिकारी तथा परिषदेचे सदस्य सचिव दीपक दातीर, रमेश कासार, रोटरीचे डॉ. विनोद मोरे, क्षितिज झावरे, मर्लिन इलिशा, एव्हँजेलिन एलिशा, महेश गोपाळकृष्णन, तुषार देशमुख, सारिका मोरे, सुजाता उबाळे, हिरा मोतीयानी आदी उपस्थित होते.जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, जिल्ह्याच्या विकासासाठी शासन तसेच प्रशासनाच्या माध्यमातून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत असले तरी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासामध्ये उद्योग व सीएसआर संस्थांची साथ अत्यंत मोलाची आहे. जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, जलस्रोत पुनरुज्जीवन, प्लास्टिकमुक्त अभियान, नवीकरणीय ऊर्जेचा वापर, घनकचरा व्यवस्थापन, कृषी, पशुसंवर्धन, क्रीडा या बाबींमध्ये सीएसआरच्या माध्यमातून उपक्रम राबविणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील दुर्बल घटक, बालक व महिलांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सीएसआर संस्थांनी पुढाकार घ्यावा जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साध्य करण्यासाठी शासन, उद्योग, सीएसआर संस्था व स्वयंसेवी संघटना यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. प्रत्येक सीएसआर प्रकल्प हा जिल्ह्याच्या विकास आराखड्याशी सुसंगत असावा, निधीची परिणामकारकता व मोजता येण्याजोगे निष्कर्ष देणारा आराखडा असावा, अशी अपेक्षा व्यक्त करत सीएसआरच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांसाठी संस्थांना आवश्यक असणाऱ्या सर्व परवानग्या एक खिडकी योजनेतून देण्याबरोबरच आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिली. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या ३ हजार ५३२ पेक्षा अधिक शाळा असून ५ हजार ३०० अंगणवाड्यांतून सर्वसामान्यांच्या पाल्यांना शिक्षण देण्यात येते. शाळांमधून शिक्षणाचा दर्जा उंचावणे, शालेय पायाभूत सुविधा बळकट करणे, डिजिटल शिक्षण व्यवस्था निर्माण करणे, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व कौशल्याधारित प्रशिक्षण उपलब्ध करून देणे या क्षेत्रांमध्ये सीएसआरचा उपयोग होणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना ५०० पेक्षा अधिक प्राथमिक आरोग्य केंद्रांतून आरोग्याच्या सेवा देण्यात येतात. या सेवा अधिक चांगल्या पद्धतीने देता याव्यात यासाठी सीएसआर संस्थांनी मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्यासाठी सहकार्य करत आरोग्य केंद्रे दत्तक घ्यावीत/घेण्यात यावीत.

जिल्ह्यात सन २०२२ पासून 'मिशन आपुलकी' अत्यंत यशस्वीपणे राबविण्यात येत असून प्रशासनाच्या गरजेनुसार सीएसआरचे नियोजन व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून बचतगटांद्वारे जिल्ह्यातील ३ लाख ५५ हजार महिलांना संघटित करत त्यांना त्यांच्या पायावर उभे करण्याबरोबरच एकल महिलांच्या पुनर्वसनाचे कामही करण्यात येत असून यासाठीही निधीचा उपयोग व्हावा, असेही त्यांनी सांगितले.परिषदेत शिक्षण, आरोग्य, महिला व बालविकास, कृषी, ग्रामीण विकास, कौशल्य विकास, पशुसंवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, पाणलोट विकास, जलसंधारण, पर्यटन क्षेत्रांचा विकास, क्रीडा विकास, रस्ते सुरक्षा, जिल्ह्यातील गरजा, प्रलंबित प्रश्न, प्रस्तावित विकास प्रकल्प व अपेक्षित सीएसआर सहकार्य याबाबत सादरीकरण करण्यात आले. उद्योग प्रतिनिधींनी विविध क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत सकारात्मक भूमिका दर्शविली.

परिषदेचे सूत्रसंचालन मुख्यमंत्री फेलो शुभम बाबर यांनी केले तर जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर यांनी आभार व्यक्त केले. परिषदेस सर्व शासकीय विभागांचे विभाग प्रमुख, उद्योगांचे, सीएसआर संस्थांचे आणि विविध स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फक्त घड्याळ आणि तुतारीचे उमेदवारांना निवडून द्या-अजित पवारांचे आवाहन

## परभणी शहर मी दत्तक घ्यायला तयार

दैनिक वादळ वार्ता
**परभणी । प्रतिनिधी**



परभणी शहर मी दत्तक घ्यायला तयार आहे, पण महापालिकेत राष्ट्रवादीच्या घड्याळ आणि तुतारीच्या सर्व उमेदवारांना निवडून द्या, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले आहे. तसेच माझ्या विचारांची महानगरपालिका निवडून दया. सर्व स्तराचा विकास करायचे काम माझे आहे. उपमुख्यमंत्री म्हणून मी शब्द देतो की इथल्या विकासाचा पाठपुरावा मी स्वतः करणार, असेही पवारांनी यावेळी म्हटले.परभणीत प्रचार सभेत बोलताना अजित पवार म्हणाले, परभणीचा जसा पाहिजे तसा विकास दुर्दैवाने झाला नाही. सर्व धर्मातील उमेदवार मग नवीन असो की जुने देण्याचा प्रयत्न करतो. दोघांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न करत असतो. पिंपरी चिंचवडचा विकास कसा केला हे विचारा, असे अजित पवार म्हणाले.पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, केंद्राचा आणि राज्याचा निधी कसा आणायचा याची सांगड घालावी लागते. परभणीत पिण्याच्या पाण्याची योजना, भूमिगत गटार योजना हातात घेतली आहे. सर्व रस्ते चांगले करू. सर्व जाती धर्मातील नागरिकांना सुविधा देऊ. जाती पातीचा, नात्याचा उमेदवार आहे म्हणून बघू नका, विकास कोण करेल हे बघा. उपमुख्यमंत्री म्हणून मी शब्द देतो की इथल्या विकासाचा पाठपुरावा मी स्वतः करणार, असे आश्वासन देखील पवारांनी यावेळी दिले.परभणी धूळ आणि खड्ड्यांचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे. मी धुळमुक्त, खड्डेमुक्त शहर करण्यासाठी पुढाकार घेतो. तसेच जिल्ह्याचे ठिकाण असेल तिथे कॅन्सरचे रुग्णालय उभे करणार. राज्याचा केंद्राचा निधी आणू, जसे पिंपरी चिंचवड, बारामती केले तसेच परभणी करू, असे आश्वासन अजित पवारांनी दिले. इथली एमआयडीसी बंद आहे ती चालू करू, तसेच उद्योगपती पाणी, जमीन, लाईट आणि रस्ते आहेत का नाही ते पाहत असतात, असेही पवार म्हणाले.

# मतदानासाठी १५ जानेवारीला सार्वजनिक सुट्टी मुंबईसह २९ महापालिका क्षेत्रांत निर्णय लागू

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**



राज्यातील २९ महापालिका निवडणुकांच्या प्रचाराचा धुरळा आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून, निवडणूक आयोगाची ईव्हीएमसह सर्व प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आणि नागरिकांना आपला हक्क बजावता यावा यासाठी राज्य सरकारने १५ जानेवारी रोजी मतदानाच्या दिवशी मुंबईसह सर्व २९ महापालिका क्षेत्रांत सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. ही सुट्टी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये तसेच खासगी आस्थापनांमधील कामगार आणि कर्मचाऱ्यांसाठी लागू असेल. प्रशासनाकडून मतदारांना या सुट्टीचा लाभ घेत मोठ्या संख्येने बाहेर पडून मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.१५ जानेवारी २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांना आपला मतदानाचा हक्क सुलभतेने बजावता यावा, यासाठी राज्य शासनाने संबंधित निवडणूक क्षेत्रांमध्ये सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. या निर्णयाबाबतची अधिकृत अधिसूचना राज्य शासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली असून, निवडणुकीच्या दिवशी सर्वत्र सुट्टीचे आदेश लागू करण्यात आले आहेत. ही अधिसूचना सर्व प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील शासकीय व निमशासकीय कार्यालये, महामंडळे आणि मंडळांना कळवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, जे मतदार संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील रहिवासी आहेत, परंतु कामानिमित्त मतदारसंघाबाहेर कार्यरत आहेत, त्यांनाही या सार्वजनिक सुट्टीचा लाभ घेता येणार आहे. प्रशासनाचा हा निर्णय मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्रशासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका व तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगरपालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.दरम्यान, मतदारांनी मतदानासाठी लोकशाहीच्या उत्सवात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन प्रशासनाच्यावतीने करण्यात आले आहे.

# बाल वैज्ञानिक प्रदर्शन विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता,संशोधन वृत्तीला दिशा देणारे व्यासपीठ-पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



बाल वैज्ञानिक प्रदर्शन हे विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता व संशोधन वृत्तीला दिशा देणारे प्रभावी व्यासपीठ आहे. आजचा विद्यार्थी हा उद्याचा शास्त्रज्ञ, संशोधक, अभियंता व राष्ट्रनिर्माता आहे. त्यामुळे देशपातळीवर होत असलेल्या नवनवीन संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना देणे आवश्यक असून, त्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

जामखेड येथील नागेश विद्यालय येथे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभाग व जिल्हा विज्ञान-गणित अध्यापक संघ, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे जिल्हास्तरीय बाल वैज्ञानिक प्रदर्शन २०२५-२६ चा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाला. त्यावेळी ते बोलत होते.


कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी आकाश दरेकर, गटविकास अधिकारी प्रदीप चव्हाण, नागेश विद्यालयाचे प्राचार्य भगवान मडके यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले , विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. विद्यार्थ्यांनी प्रयोग, संशोधन व निरीक्षणावर भर दिला पाहिजे. आज जगभरात भारतीय शास्त्रज्ञ आपली क्षमता सिद्ध करत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीतून आत्मनिर्भर भारताकडे देशाची वाटचाल सुरू आहे. देशात तसेच जगभरात तंत्रज्ञानात होत असलेले बदल व नवनवीन संशोधनाची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी, यासाठी इस्रो, नासा यांसारख्या वैज्ञानिक संस्थांना विद्यार्थ्यांच्या सहलीचे आयोजन करण्यात यावे.ते पुढे म्हणाले, संशोधन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. आजच्या घडीला प्रत्येक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल होताना दिसत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विविध क्षेत्रांमध्ये वेगाने वाढत आहे. देश कौशल्य विकास कार्यक्रमात उभारी घेत असून, उद्योगांच्या मागणीनुसार अभ्यासक्रम तयार करण्यात येत आहेत. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमातून कौशल्याधारित कोर्सेस सुरू करण्यात यावेत. कालानुरूप शैक्षणिक अभ्यासक्रमातील बदलते प्रवाह यासारख्या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. आजच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगात अशा जिल्हास्तरीय प्रदर्शनांमधून भावी गुणवंत वैज्ञानिक घडावेत, यासाठी आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. प्रदर्शन आयोजनासाठी असलेल्या ५ लाख रुपयांच्या निधीत वाढ करून तो १ कोटी रुपयांपर्यंत करण्यात येईल. या माध्यमातून जिल्ह्यातून भविष्यात मोठे शास्त्रज्ञ व संशोधक घडतील, असा विश्वास व्यक्त करून त्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) संध्या गायकवाड म्हणाल्या की, विद्यार्थ्यांमध्ये गणित व विज्ञान विषयांबाबत आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या तीन महिन्यांपासून प्रत्येक तालुक्यात बाल वैज्ञानिक प्रदर्शनांचे आयोजन करण्यात आले असून, त्यामधून उत्कृष्ट ठरलेली उपकरणे जिल्हास्तरीय प्रदर्शनात सादर करण्यात आली आहेत. मूल्यांकनानंतर उत्कृष्ट ठरलेल्या २९ उपकरणांचा राज्यस्तरीय प्रदर्शनात समावेश करण्यात येणार आहे.या बाल वैज्ञानिक प्रदर्शनात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शाळांमधील विद्यार्थ्यांनी विज्ञान, गणित, पर्यावरण, आरोग्य, शेती, ऊर्जा, पाणी व्यवस्थापन, डिजिटल तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या विषयांवर आधारित नाविन्यपूर्ण प्रकल्प सादर केले. विध्यार्थ्यांच्या या प्रकल्पाची पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी प्रत्यक्ष पाहणी करून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, संशोधन वृत्तीचे व सामाजिक जाणिवेचे दर्शन घडविणाऱ्या या प्रकल्पांचे कौतुक केले.

कार्यक्रमात विविध गटांतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे, सन्मानचिन्हे व पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमास जिल्हा विज्ञान-गणित अध्यापक संघाचे पदाधिकारी, अधिकारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपजिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली तंबाखू नियंत्रण समितीची आढावा बैठक

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**



उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम व राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत जिल्हास्तरीय समन्वय समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीत वर्षभरातील विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. उपजिल्हाधिकारी ठाकूर यांनी सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व त्यांच्या परिसरात तंबाखूचा वापर पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश दिले. कोपटा २००३ कायद्यानुसार कार्यालय प्रमुखांनी दंडात्मक कारवाई करून आपले कार्यालय तंबाखूमुक्त ठेवावे, असे आवाहन श्रीमती ठाकूर यांनी केले. तसेच, जिल्ह्यातील सर्व शैक्षणिक संस्थांना तंबाखूमुक्त करण्यावर भर देण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी शालेय प्रशासनाने प्रयत्न करावेत आणि तंबाखूमुक्त शाळेचे निकष पूर्ण करावेत, अशा सूचना शिक्षण अधिकारी व शिक्षण विभागाला देण्यात आल्या.

बैठकीला पोलीस उपाधीक्षक दिलीप सगर, सहाय्यक आयुक्त (अन्न व औषधी प्रशासन) प्रशांत काकडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा, डॉ. आनंद कलमे, विक्रीकर अधिकारी श्री. सुरवसे तसेच सर्व तालुकास्तरीय गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते.

# वळग येथील ऐतिहासिक आई म्हैसाई देवीच्या यात्रेत कुस्तीचा थरार;तहसीलदार भरतराव सूर्यवंशी यांच्या हस्ते बक्षीस वितरण

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**



तालुक्यातील मौजे वळग येथील ऐतिहासिक, सुप्रसिद्ध आणि जागृत देवस्थान असलेल्या आई म्हैसाई देवीच्या वार्षिक यात्रेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य कुस्ती स्पर्धेचा समारोप मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेतील शेवटची आणि प्रतिष्ठेची कुस्ती देगलूर तालुक्याचे सन्माननीय तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी भरतराव सूर्यवंशी साहेब यांच्या शुभहस्ते लावण्यात आली.

**मैदानात रंगला कुस्तीचा थरार**

यात्रेनिमित्त आयोजित या कुस्ती स्पर्धेसाठी महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या चारही राज्यांतून नामांकित पैलवान आणि कुस्तीप्रेमींनी मोठी गर्दी केली होती. अटीतटीच्या झालेल्या या लढतींनी प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

**पैलवानांचा यथोचित सन्मान**

स्पर्धेच्या शेवटी तहसीलदार भरतराव सूर्यवंशी यांनी मैदानातील विजेत्या आणि उपविजेत्या अशा दोन्ही पैलवानांना सन्मानित केले. खेळात हार-जीत होत असते, मात्र जिद्द महत्त्वाची आहे, असे म्हणत त्यांनी पैलवानांना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या उपस्थितीमुळे खेळाडूंचा उत्साह द्विगुणित झाला होता.

**ग्रामस्थांकडून आभार व्यक्त**

या यशस्वी आयोजनाबद्दल मौजे वळग येथील यात्रा नियोजन समिती आणि समस्त गावकरी मंडळींच्या वतीने तहसीलदार भरतराव सूर्यवंशी साहेब यांचे विशेष आभार मानण्यात आले. तसेच, शेजारील राज्यांतून आलेल्या सर्व कुस्ती शौकिनांचे आणि ग्रामस्थांचेही समितीने जाहीर आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमामुळे वळग परिसरातील कुस्ती परंपरेला नवसंजीवनी मिळाली असून, सर्वत्र या नियोजनाचे कौतुक होत आहे

# रस्त्यावरील सुरक्षा हाच जीवनाचा आधार; तळोदा येथे नवीन वाहन चालकांसाठी मार्गदर्शन व नेत्र तपासणी शिबिर

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

वाढते रस्ते अपघात रोखण्यासाठी आणि वाहन चालकांमध्ये शिस्त लागावी यासाठी सध्या राज्यभर 'रस्ता सुरक्षा सप्ताह' साजरा केला जात आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, नंदुरबार यांच्या वतीने तळोदा येथील शासकीय विश्रामगृहात नवीन वाहन परवाना धारकांसाठी विशेष मार्गदर्शन व मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नंदुरबारचे प्रादेशिक परिवहन अधिकारी उत्तमराव जाधव, सहाय्यक उपप्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल नलावडे व अक्षय येवले यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. याप्रसंगी मोटार वाहन निरीक्षक रोहित पवार, दिव्वेश उबाळे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक गिरीश पाटील, अमित तडवी आणि मनोहर गांगुर्डे प्रामुख्याने उपस्थित होते.

शिबिरात नवीन परवाना घेण्यासाठी आलेल्या तरुणांना व नागरिकांना रस्ते सुरक्षेच्या नियमांची माहिती देण्यात आली. मार्गदर्शन करताना अधिकारी रोहित पवार म्हणाले की, दुचाकी चालवताना 'हेल्मेट' आणि चारचाकी चालवताना 'सीटबेल्ट' हे केवळ कायदेशीर नियम नसून ते जीवनरक्षक कवच आहेत. निरीक्षक दिव्वेश उबाळे यांनी सांगितले की, वाहन नेहमी रस्त्याच्या डाव्या बाजूनेच चालवावे. ओव्हरटेकिंग करताना घाई करू नये. मद्यपान करून वाहन चालवणे हे स्वतःच्या आणि इतरांच्या जीवासाठी धोकादायक असून, यामुळेच बहुतांश गंभीर अपघात घडतात, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

**आरोग्य तपासणीवर भर:–**वाहन चालवताना नजर चांगली असणे ही प्राथमिक गरज आहे. हे लक्षात घेऊन उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने या शिबिरात सर्व नवीन परवाना धारकांसाठी मोफत नेत्र तपासणी उपलब्ध करून दिली होती. तज्ज्ञांमार्फत चालकांच्या दृष्टीची तपासणी करण्यात आली, जेणेकरून भविष्यातील रस्ते अपघात टाळता येतील. तळोदा शासकीय विश्रामगृह येथे दरमहा दोन दिवस कच्चे व पक्के वाहन चालक परवाना देण्याचे काम आरटीओ कार्यालयामार्फत केले जाते. मात्र, ०१ जानेवारी ते २९ जानेवारी २०२६ या रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने यावेळच्या शिबिरात जनजागृतीवर विशेष भर देण्यात आला. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक गिरीश पाटील, अमित तडवी आणि मनोहर गांगुर्डे यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमाचे तळोदा परिसरातील नागरिकांनी स्वागत केले आहे.



## कात्री येथे बाल स्पर्धकांमध्ये दिसली संभावना

# सांस्कृतिक कार्यक्रम अन् क्रीडा स्पर्धा: केंद्रांतर्गत ३४८ विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

**रविंद्र वळवी । मोलगी**

बालकांमधील खिलाडू वृत्तीला चालना देण्यासाठी पाडावपाडा, कात्री (ता.धडगाव) येथे केंद्रस्तरीय सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात १४५ बालकलाकार व २०३ खेळाडूंनी भाग घेतला. दरम्यान सहभागी विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण व खरी खिलाडू वृत्ती दिसून आली.



सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन माजी जि.प.सभापती गणेश पराडके यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी कात्रीचे सरपंच संदीप वळवी होते. तर माजी पंचायत समिती सदस्य सविता पाडवी, दिलीप पाडवी, गटशिक्षणाधिकारी डी डी. राजपूत, विस्तार अधिकारी डी.एम.चित्ते, केंद्र प्रमुख शंकर वसावे, माजी सरपंच बारकीबाई वळवी, सेमट्या वळवी यांच्यासह केंद्रातील सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान सर्व विजेत्या संघाचा पदके व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. क्रीडा स्पर्धांचा निकाल कबड्डी मुले: प्रथम– विजेता संघ जि.प.शाळा शेलखेडीपाडा मुली: प्रथम– विजेता संघ जा.प.शाळा कामोदपाडा खो खो मुले: प्रथम– जि.प.शाळा शेलखेडीपाडा मुली: प्रथम– जि.प.शाळा कामोदपाडा अन्य मैदानी खेळांमध्ये जि.प.शाळा पडावपाडा, शेलखेडीपाडा, कामोदपाडा येथील विध्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकवला.सांस्कृतिक कार्यक्रमात हानिपाडा शाळेने प्रथम क्रमांक पटकवला तर बिलपाडा शाळेने द्वितीय बक्षीस मिळवले.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेला सरस्वती महाविद्यालय केजच्या माजी प्राचार्य रोहिणी गजेंद्रगडकर यांची सदिच्छा भेट

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेला सरस्वती महा विद्यालय केजच्या माजी प्राचार्या श्रीमती रोहिणी गजेंद्रगडकर–काळे मॅडम यांनी सदिच्छा भेट देऊन विद्यार्थ्यांशी शैक्षणिक हितगुज केले व विद्यार्थ्यांना शिक्षण विषयी मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या सोबत आलेले त्यांचे यजमान श्री.शामराव भाऊराव काळे साहेब केज चे सेवानिवृत्त सबपोष्टमास्तर यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणाविषयी मार्गदर्शन केले.या दोघांनी या शाळे तील सर्वशिक्षक,शिक्षिका वृंदांना मार्गदर्शन करुन पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा दिल्या.या शाळे तील लोकनेते मा.आ.कै. बाबुरावजी आडसकर साहेब यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ प्राप्त शिक्षक श्री. आबासाहेब तुळशीराम धपाटे सर यांचा सत्कार केला.श्रीमती गजेंद्रगडकर मॅडम या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची या शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांच्या शिक्षिका होत्या.या दांपत्याचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन आदर सत्कार करुन सन्मानित करण्यात आले.त्यांनी कुंबेफळ येथील श्री सिद्धि विनायक गणपतीचे दर्शन दर्शन घेतले.शेवटी श्री. आबासाहेब तुळशिराम धपाटे सरांनी आभार मानले.या शाळेतील प्राथमिक पदवीधरशिक्षक डॉ.श्री.रामकिशन मुळे सर,आकाश लोंढे सर, राहुल बजरंग बचुटे सर, प्राथमिक पदवीधरशिक्षक श्री.संदीप मेघराज ठोंबरे सर,श्रीमती भोरे निलावती आनंदराव मॅडम,श्रीमती उटीकर अंजली गोविंदराव मॅडम, ट्रेनी शिक्षिका रोहिणी श्रीधर काळे मॅडम आदी शिक्षकवृंद उपस्थित होते.



# वाढदिवसाचा वायफळ खर्च टाळून शाळेला ५१ खुर्च्यांची भेट; धवळीविहीरच्या भाजीपाला विक्रेत्याचा आदर्श उपक्रम

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

आजच्या काळात वाढदिवस म्हटला की मोठा खर्च, पार्ट्या आणि दिखावा असे समीकरण बनले आहे. मात्र, धवळीविहीर येथील एका सामान्य कुटुंबातील भाजीपाला विक्रेत्याने आपला वाढदिवस अत्यंत आगळ्यावेगळ्या आणि स्तुत्य पद्धतीने साजरा करून समाजासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. सर्वसामान्य कुटुंबातून आलेले आणि मेहनतीने आपला भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करणारे राजेंद्र रतिलाल पाडवी यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, धवळीविहीर येथील विद्यार्थ्यांसोबत वेळ घालवला. केवळ शुभेच्छा स्वीकारण्यापुरते मर्यादित न राहता, त्यांनी शाळेला ५१ खुर्च्या आणि संविधान समितीचे सदस्य जयपाल मुंडा यांची प्रतिमा भेट म्हणून दिली. त्यांच्या या दातृत्वामुळे शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये मोलाची भर पडली असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वातावरणास नवी उभारी मिळणार आहे.या छोटेखानी परंतु प्रेरणादायी कार्यक्रमाला गावातील मान्यवरांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये पोलीस पाटील हिरालाल पावरा, जितेंद्र पावरा, अमृतसिंग पावरा, कांतीलाल पटले, डॉ. भरत पावरा, प्रकाश पावरा यांसह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थित सर्वांनी श्री. पाडवी यांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. श्री. पाडवी यांच्या या कृतीतून हे सिद्ध झाले आहे की, समाजसेवा करण्यासाठी श्रीमंतीपेक्षा मोठ्या मनाची गरज असते. त्यांच्या या उपक्रमाची चर्चा परिसरात मोठ्या प्रमाणावर होत असून, इतर नागरिकांनीही आपल्या आनंदाच्या क्षणी अशाच प्रकारे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. **समाजाकडून आपल्याला खूप काही मिळते, त्याची परतफेड अशा सामाजिक कार्यातून करणे हीच खरी मानवसेवा आहे, अशी भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केली.**



# नांदूर फाटा येथील आदर्श मतिमंद विद्यालयाचे यश



**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे दिव्यांग मुलांमुलींची जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये खिंडकर यशराज हरिश्चंद्र या दिव्यांग विद्यार्थ्याने गोळा फेक व १०० मीटर धावणे या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळवला आहे. या वेळी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी श्रीमती प्रिया राणी पाटील व वै.स.का.नखाते यांच्या हस्ते ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तांदळे व क्रीडाशिक्षक फारुकी हे उपस्थित होते. तसेच शाळेवरही हरिओम शिक्षण प्रसारक मंडळ संचालित आदर्श मतिमंद निवासी विद्यालयाचे अध्यक्ष व सचिव आदिनाथ सुर्वे व विजयकुमार सुर्वे यांच्या हस्ते विद्यार्थी यांचा व कला शिक्षक फारूकी मुख्याध्यापक सुरेश तांदळे यांचाही सत्कार करण्यात आला.यावेळी शाळेचे सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

# बेटकबिलोली येथे सर्वधर्मीय अखंड शिवनाम सप्ताह शिवकथा ज्ञानयज्ञ सोहळा

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । हनुमंत चंदनकर**

नायगाव तालुक्यातील बेटकबिलोली येथे प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दिनांक १० जानेवारी १७ जानेवारी पर्यंत सर्व धर्मीय अखंड शिवनाम सप्ताह व शिव कथा ज्ञान यज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे सप्ताहातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे पाच ते शिवपाठ सहा ते सात महादेवाचा अभिषेक आठ ते दहा परमरहस्य पारायण, दहा ते बारा गाथा भजन, दुपारी दोन ते चार शिवकथा, सायंकाळी शिवपाठ व रात्री आठ ते अकरा शिवकिर्तन व रात्री शिवजागर महाराष्ट्रातील नामवंत शिवकिर्तनकार शि भ प कैलास महाराज डोंगरगावकर, संजय महाराज येळापूरे,कु संगीता ताई बेंद्रीकर, विकास महाराज धसेवाडीकर, शिवानंद महाराज दापशेटकर संतोष पुरी महाराज चौळाखेकर, शिवानंद महाराज शास्त्री, विश्वंभर महाराज बडूरे, टाळ आरतीचे किर्तन कालिदास महाराज किडे, १७ जानेवारी रोजी रुद्र मुनी शिवाचार्य महाराज यांचे आगमन व प्रवचन भव्य महाप्रसाद तरी परिसरातील भाविकांनी लाभ घ्यावी असे आवाहन समस्त गावकरी मंडळ बेटकबिलोली यांच्या वतीने करण्यात आले आहे



# समानतेची शिकवण आणि संस्कार गरजेचे–सायली परांजपे

## मुलाच्या विकासात पालकांची अहम भूमिका–डॉ.विनोद वेदपाठक

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाचा अविवेकी व विकृत वापर समाजात मोठया प्रमाणावर सुरू असून या परिस्थितीत आपल्या मुलांना समानतेची शिकवण आणि संस्कार देण्याची मोठी जबाबदारी पालक, शिक्षक, शाळा आणि समाजावर आलेली आहे. तंत्रज्ञानाच्या गैरवापराच्या या काळात माता पालकांनी अधिक जागरूक राहून खंबीर बनले पाहिजे असे प्रतिपादन सायली परांजपे यांनी केले तर बदलत्या जीवनशैलीत वयवर्षे १० ते १९ या दरम्यान पालकांनी मुलांसाठी वेळ द्यावा असे मत डॉ.विनोद वेडपाठक व्यक केले. परळी तालुक्यातील मोहा येथील महाराष्ट्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राजमाता जिजाऊ जयंतीनिमित्त शनिवार



दि १० रोजी माता–पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी लेखिका व विविध राष्ट्रीय दैनिकात उपसंपादिका म्हणून कार्य केलेल्या सायली परांजपे, मानवलोक अंबाजोगाई येथील कल्पना लोहिया, अंबाजोगाई येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जनऔषध वैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विनोद वेदपाठक, डॉ.निधी मेहता, डॉ.मयुरी, सुदर्शन भोसले, संस्थचे सचिव ऑड.अजय बुरांडे, जेष्ठ संचालक सुदामदादा देशमुख, शाळेचे प्राचार्य मुरलीधर बोराडे आदी प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना परांजपे म्हणाले की, राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी दिलेला आदर्श पुढे घेऊन जाण्यापेक्षा त्याच्या विचारांच्या उलट दिशेला समाजाची वाटचाल सुरू असून या विदारक परिस्थितीत समाजातील सर्वच घटकांनी सामूहिक पालकत्व निभावने गरजेचे बनले आहे. तर डॉ.वेदपाठक यांनी मुलांच्या किशोरवयीन वयात होणारे बदल व याकाळात पालकांची जबाबदारी याचे महत्व उपस्थित पालकांना करून दिले. या माता–पालक मेळाव्याचे अध्यक्षीय समारोप संस्थेचे सचिव ऑड अजय बुरांडे यांनी केले या प्रसंगी राजमाता जिजाऊ यांनी १६ व्या शतकात स्वराज निर्मीतीची शिकवण देत सार्वभौमत्व रुजविण्यासाठी प्रयत्न केले मात्र विद्यमान काळात हुकूमशाही पद्धतीने वाटचाल सुरू असून या मध्ये विद्यार्थी व युवकावर मोठा अन्याय होण्याचे प्रमाण वाढले असल्याचे सांगितले.

या मेळावा प्रसंगी गावातील आणि परिसरातील माता–पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्तावित बालाजी कडभाने, सूत्रसंचलन गिरीश तोंडारे तर आभार व्यक्त प्राचार्य मुरलीधर बोराडे यांनी केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077